# वाघ अभियांत्रिकीच्या ३४ विद्यार्थ्यांना प्लेसमेंट संधी

प्रतिनिधी | नाशिक



के. के. वाघ शिक्षण संस्थेच्या अभियांत्रिकी महाविद्यालयात नुकत्याच पार पडलेल्या कॅम्पस इंटरव्ह्यूमध्ये ३४ विद्यार्थ्यांना प्लेसमेंटची संधी मिळाली. सर्व विद्यार्थी अभियांत्रिकीच्या अखेरच्या वर्षात शिक्षण घेत असून त्यांना महाविद्यालयांच्या प्लेसमेंट ड्राइव्हमधून नामवंत कंपन्यांकडून प्लेसमेंटची संधी मिळाली आहे. हिंद रेक्टिफायर्स, विप्रो आणि पर्सिस्टंट सिस्टिम्स या नामांकित कंपन्यांकडून महाविद्यालयातील केमिकल, मेकॅनिकल, इलेक्ट्रिकल, इलेक्ट्रानिक्स, कॉम्प्युटर, आयटी आणि प्रॉडक्शन या विभागाच्या विद्यार्थ्यांचा समावेश आहे.

या सर्व कंपनीच्या मुलाखतीमध्ये ऑनलाइन टेस्टनंतर टेक्निकल व त्यानंतर वैयक्तिक मुलाखतीची फेरी घेण्यात आली. सरासरी ६० टक्के गुण असलेल्या विद्यार्थ्यांना या कॅम्पस इंटरव्ह्यूमध्ये भाग देण्यात आला. सुरुवातीला प्री-प्लेसमेंट चर्चेद्वारे कंपनीविषयी माहिती, मुलाखतीची प्रक्रिया तसेच पॅकेज आदी बाबींवर विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली.

संपूर्ण प्रक्रिया महाविद्यालयाच्या डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम करिअर डेव्हलपमेंट सेंटर येथे पार पडली.

संस्थेचे अध्यक्ष बाळासाहेब वाघ, विश्वस्त समीर वाघ, सचिव प्रा. के. एस. बंदी, प्राचार्य डॉ. के. एन. नांदूरकर आणि ट्रेनिंग अँण्ड प्लेसमेंट ऑफिसर डॉ. पी. के. शहाबादकर यांचे मार्गदर्शन लाभले.

## या कंपन्यांत झाली निवड

विप्रो कंपनीत १५, पर्सिस्टन्ट सिस्टिम्समध्ये ११ तर हिंद रेक्टिफायर्समध्ये ८ असे एकूण ३४ विद्यार्थ्यांना ४.४ लाख आणि सरासरी तीन लाख ५० हजार रुपयांचे पॅकेज दिले. यामध्ये कॉम्प्युटर शाखेचे १६, आयटीचे ८, इलेक्ट्रिकलचे ५ तर मेकॅनिकलचे २ यांसह इतर शाखांचे तीन असे १८ विद्यार्थी व १६ विद्यार्थिनींना प्लेसमेंटची संधी मिळाली.

सकाळ

# वाघ अभियांत्रिकीच्या ३४ विद्यार्थ्यांची निवड

**सकाळ वृत्तसेवा**



**नाशिक : के. के. वाघ अभियांत्रिकी महाविद्यालयात झालेल्या कॅम्पस इंटरव्ह्यूमध्ये निवड झालेल्या विद्यार्थ्यांसमवेत प्राचार्य डॉ. के. एन. नांदूरकर व प्राध्यापक.**

नाशिक, ता. २३ : येथील के. के. वाघ शिक्षण संस्थेच्या अभियांत्रिकी महाविद्यालयात झालेल्या कॅम्पस इंटरव्ह्यूमध्ये ३४ विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली. निवड झालेले सर्व विद्यार्थी अभियांत्रिकीच्या अखेरच्या वर्षात शिक्षण घेत आहेत. हिंद रेक्टिफायर्स, विप्रो आणि पर्सिस्टन्ट सिस्टिम्स या नामांकित कंपन्यांकडून महाविद्यालयातील केमिकल, मेकॅनिकल, इलेक्ट्रिकल, इलेक्ट्रॉनिक्स, कॉम्प्युटर, आयटी आणि प्रोडक्शन विभागाच्या विद्यार्थ्यांसाठी कॅम्पस इंटरव्ह्यू घेण्यात आला.

प्रारंभी सर्व कंपन्यांकडून विद्यार्थ्यांची ऑनलाइन चाचणी घेण्यात आली. त्यानंतर तांत्रिक चाचणी व वैयक्तिक मुलाखतीची फेरी झाली. सरासरी ६० टक्के गुण असलेल्या विद्यार्थ्यांना कॅम्पस इंटरव्ह्यूमध्ये सहभागी करून घेतले. सुरवातीला प्री-प्लेसमेंट चर्चाद्वारे कंपनीविषयी माहिती, मुलाखतीची प्रक्रिया, तसेच पॅकेज आदी माहिती दिली. ही संपूर्ण प्रक्रिया महाविद्यालयाच्या डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम करिअर डेव्हलपमेंट सेंटर येथे झाली.

दरम्यान, विप्रो- १५, पर्सिस्टन्ट सिस्टिम्स- ११, हिंद रेक्टिफायर्स- आठ असे एकूण ३४ विद्यार्थ्यांना सरासरी तीन लाख ५० हजारांचे पॅकेज दिले. निवड झालेल्या विद्यार्थ्यांमध्ये कॉम्प्युटर- १६, आयटी- आठ, इलेक्ट्रिकल- पाच, मेकॅनिकल- दोन, इलेक्ट्रॉनिक्स- एक, प्रोडक्शन- एक आणि केमिकल- एक अशा १८ मुले व १६ मुलींचा समावेश आहे. महाविद्यालयातर्फे विद्यार्थ्यांना प्रशिक्षण दिले गेले. यशस्वी विद्यार्थ्यांचे संस्थेचे अध्यक्ष बाळासाहेब वाघ, विश्वस्त समीर वाघ, सचिव प्रा. के. एस. बंदी, प्राचार्य डॉ. के. एन. नांदूरकर आणि ट्रेनिंग अॅन्ड प्लेसमेंट अधिकारी प्रा. डॉ. पी. के. शहाबादकर यांनी अभिनंदन केले.

Nashik, Nashik-Today
24/04/2019 Page No. 4

आपलं महानगर

# वाघ अभियांत्रिकीच्या ६५ विद्यार्थ्यांची निवड



**नाशिक** ▶▶ कर्मवीर काकासाहेब वाघ इंजिनिअरिंग कॉलेजमध्ये सुरू असलेल्या कॅम्पस मुलाखतींमध्ये ६५ विद्यार्थ्यांना विविध नामांकित कंपन्यांमध्ये नोकरीची संधी मिळाली. टाटा कन्सल्टन्सी सर्विसेस, विंजित टेक्नॉलॉजी आणि लुपिनफार्मा कंपनीने वाघ अभियांत्रिकी महाविद्यालयातील केमिकल, मेकॅनिकल, इलेक्ट्रिकल, इलेक्ट्रॉनिक्स, कॉम्प्युटर, आयटी, आणि ई. अ‍ॅण्ड टि. सी. इंजिनिअरिंगच्या विद्यार्थ्यांची मुलाखत घेतली.

टाटा कन्सल्टन्सी सर्विसेस ५५, विंजित ८ आणि लुपिन २ असे एकूण ६५ विद्यार्थांना सरासरी ३.४० लाखांचे पॅकेज देऊन ऑफर लेटर दिले. यामध्ये कॉम्प्युटर ३५, ई. अ‍ॅण्ड टि.सी.१२, आयटी ९, इलेक्ट्रॉनिक्स ४, केमिकल २, मेकॅनिकल २, इलेक्ट्रिकल विभागातील एका विद्यार्थ्याची निवड झाली. निवड झालेल्या विद्यार्थ्यांमध्ये २६ विद्यार्थी व ३९ विद्यार्थिनींचा समावेश आहे. महाविद्यालयाचे ट्रेनिंग अ‍ॅण्ड प्लेसमेंट अधिकारी डॉ. पी. के. शहाबादकर यांनी जबाबदारी सांभाळली. वाघ शिक्षण संस्थेचे अध्यक्ष बाळासाहेब वाघ, प्राचार्य डॉ. केशव नांदूरकर, डॉ. एस. एस. साने, डॉ. बी. ई. कुशारे आदींनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

Nashik Edition
4 Apr, 2019 Page No. 4
Powered by : eReleGo.com

सकाळ



नाशिक : कॅम्पस ड्राइव्हमध्ये निवड झालेले के. के. वाघ अभियांत्रिकी महाविद्यालयाचे विद्यार्थी. समवेत उपस्थित पदाधिकारी.

# वाघ अभियांत्रिकीतील ६५ विद्यार्थ्यांची निवड

## टीसीएस, विंजित, लुपिन फार्माचा कॅम्पस ड्राइव्ह समावेश

**सकाळ वृत्तसेवा**

नाशिक, ता. ३ : के. के. वाघ अभियांत्रिकी महाविद्यालयात कॅम्पस इंटरव्ह्यूमध्ये टाटा कन्सल्टन्सी सर्व्हिसेस (टीसीएस), विंजित टेक्नॉलॉजी आणि लुपिन फार्मा या कंपन्यांनी शिक्षण पूर्ण होण्याआधीच ६५ विद्यार्थ्यांची निवड केली.

महाविद्यालयातील केमिकल, मेकॅनिकल, इलेक्ट्रिकल, इलेक्ट्रॉनिक्स, कॅम्प्युटर, आयटी आणि ई अॅन्ड टीसी अभियांत्रिकीच्या विद्यार्थ्यांसाठी इंटरव्ह्यू झाला. कंपनीच्या प्रतिनिधींचे स्वागत प्राचार्य डॉ. के. एन. नांदुरकर यांनी केले. टीसीएस कंपनीने ५५, विंजितने आठ, लुपिनने दोन असे एकूण ६५ विद्यार्थ्यांची निवड केली. या विद्यार्थ्यांना सरासरी तीन लाख ४० हजार रुपयांचे वार्षिक पॅकेज देण्यात आले, अशी माहिती प्रा. डॉ. पी. के. शहाबादकर यांनी दिली. संस्थाध्यक्ष बाळासाहेब वाघ, चांगदेवराव होळकर, अशोक मर्चंट, समीर वाघ, प्रा. के. एस. बंदी आदींनी निवड झालेल्या विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

# वाघ इंजिनीअरिंगच्या विद्यार्थ्यांचे यश

म. टा. प्रतिनिधी, नाशिक



के. के. वाघ इंजिनीअरिंग कॉलेजमध्ये कॅम्पस इंटरव्ह्यू प्रक्रिया राबविली जात असून नामांकित कंपन्यांनी हजेरी लावत कॉलेजच्या ६५ विद्यार्थ्यांना नोकरीची संधी दिली आहे. यामध्ये २६ मुले व ३९ मुलींचा समावेश असून शिक्षण पूर्ण होण्यापूर्वीच विद्यार्थ्यांना रोजगार मिळावा, यासाठी कॉलेजतर्फे हा उपक्रम राबविण्यात आला. टाटा कन्सल्टन्सी सर्व्हिसेस, विनजित टेक्नॉलॉजिज आणि लुपिन फार्मा कंपन्यांच्या अधिकाऱ्यांची यावेळी उपस्थिती होती.

केमिकल, मेकॅनिकल, इलेक्ट्रिकल, इलेक्ट्रॉनिक्स, कम्प्युटर, आयटी आणि ई ॲण्ड टीसी इंजिनीअरिंगच्या विद्यार्थ्यां नोकरीच्या संधी मिळवून देण्याच्या उद्देशाने कॉलेजकडून कॅम्पस इंटरव्ह्यू घेण्यात आला. या कंपनीकडून आलेल्या मान्यवरांचे प्राचार्य डॉ. के. एन. नांदूरकर यांनी स्वागत करून व विद्यार्थ्यांना दिलेल्या संधीबाबत आभार मानले. सरासरी साठ टक्के मार्क असलेल्या विद्यार्थ्यांना या कॅम्पस इंटरव्ह्यूमध्ये सहभागी होता आले. प्रारंभी प्री प्लेसमेंट चर्चेद्वारे विद्यार्थ्यांना कंपनीविषयी माहिती, मुलाखतीची प्रक्रिया तसेच पॅकेज याविषयी माहिती देण्यात आली.

या सर्व कंपन्यांच्या मुलाखतीमध्ये ऑनलाइन टेस्ट, टेक्निकल टेस्ट, वैयक्तिक मुलाखतीची फेरी घेण्यात आली. यामध्ये टाटा कन्सल्टन्सी सर्व्हिसेस कंपनीने ५५, विनजित टेक्नॉलॉजीज ८ आणि लुपिन फार्मा कंपनीत २ असे एकूण ६५ विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली. या विद्यार्थ्यांना सरासरी ३ लाख ४० हजार पॅकेजचे ऑफर लेटर प्रदान करण्यात आले, अशी माहिती कॉलेजचे ट्रेनिंग ॲण्ड प्लेसमेंट अधिकारी डॉ. पी. के. शहाबादकर यांनी दिली. या विद्यार्थ्यांचे संस्थेचे अध्यक्ष बाळासाहेब वाघ, विश्वस्त चांगदेव होळकर, अशोक मर्चंट, समीर वाघ, सचिव प्रा. के. एस. बंदी आदींनी अभिनंदन केले.

दै.महाराष्ट्र टाइम्स
दि.०४-०४-२०१९